**<u>विशेष दिवाणी दावा क्र. १२९/२०११</u>**

**<u>CNR No. MHSO060004602011</u>**

कमलाकर साळुंखे (मयत) वारस वगैरे

वि.

बाबुराव जवळेकर वगैरे

## <u>आदेश निशाणी क्र. १६४ वर</u>

०१. सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्रे दाखल करण्यास वादी यांनी परवानगी मागितलेली आहे. त्यावर प्रतिवादी यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. अर्ज खरा व कायदेशीर नाही. सदर कागदपत्रे सार्वजनिक स्वरुपाची नाहीत. त्यांना निशाणी क्रमांक देऊन पुराव्याकामी वाचता येणार नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे वादी यांनी सांगितले आहे.

०२. अर्जासोबतच्या यादीप्रमाणे वादी हे फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १७९/०३ मधील सर्टीफाईड प्रती दाखल करत आहेत. सदर कागदपत्रांना निशाणी क्रमांक देणेबाबत साक्षीपुरावा देताना विचारात घेता येईल. त्यामुळे कागदपत्रे रेकॉर्डवर दाखल करण्यास परवानगी दिली तर प्रतिवादी यांचे नुकसान होणार नाही. या दाव्यातील वाद विषयाचा गुणदोषावर अंतिम व योग्य निर्णय होण्यासाठी नमूद कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य राहील. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्र दाखल करण्यास वादी यांना परवानगी देण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

दि. १३/१०/२०२१

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 13/10/2021 |
| Order uploaded on | : | 14/10/2021 |